

# अवस्था

## श्रीपाद गंगाधर कावळे

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४४८

REFBK-0023508
REFBK-0023508

संदर्भ काव्य
२४४८
२३५०८
२०।७।८२

# अ व स्था

( काव्य संग्रह )

श्रीपाद गंगाधर कावळे

REFBK-0023508
REFBK-0023508

वसुधा प्रकाशन

# अ व स्था

वसुधा प्रकाशन

पहिली आवृत्ती
डिसेंबर १९८१

© सौ. प्रतिभा कावळे
२९९ शंकर नगर, नागपूर ४४० ०१०

मुखपृष्ठ : संजय धोतरकर

प्रकाशक
वसंत लुले
वसुधा प्रकाशन
जोशीवाडी, सीताबर्डी,
नागपूर - ४४० ०१२

मुद्रक
मधुसूदन बनहट्टी
नारायण मुद्रणालय
२२४, टिकेकर रोड
धनतोली, नागपूर - ४४० ०१२

किंमत : पंधरा रुपये

*To him who in the love of nature holds*
*Communion with her visible forms, she speaks*
*A various language:*

*– William C. Bryant.*

## त्यांच्या स्मृतीस—

तडे गेले तरी तटस्थ अधान्तरावर
प्रवाहाशी झुंज देत : झुंजार हात
माध्यान्हीचा तळपता सूर्य
डोईवर घेऊन चाललेत आजन्म
शुष्क रेताड वाळवंटातून
ज्यांना खजूर दिसलेच नाहीत
बदलल्या नाहीत वाटा
पायतळी घातलेत कित्येक घाट
जोपासली सत्ये, वाकले नाहीत
ऐरणीवर घडवलेले घण साहून
आकारले तजेल अस्तित्व.

आम्ही, ठेवलेत बंद पेटीत
एक शोभापात्र म्हणून
एक ऐतिहासिक संदर्भ म्हणून.

श्रीपाद गंगाधर कावळे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४४८
२३५०८
काव्य २३/७/८२
(स्थळ प्रत)

# “ अवस्थे ”च्या निमित्ताने

माझ्या “ अस्मिता ” या प्रथम काव्यसंग्रहाने मला बरेच काही दिले आहे, तद्नंतरचा “ अवस्था ” हा कवितासंग्रह रसिकास सादर करताना आनंद होत आहे.

निसर्ग आणि मानव यांच्यातील अवलोकिलेले समत्व आणि भिन्नत्व यातून दृष्टोत्पत्तीस आलेली निसर्गाची मूल्यांकित महत्तमता हेच या कवितेचे मूलगामी प्रयोजन होय.

२९९ शंकर नगर
नागपूर–१०

–श्रीपाद गंगाधर कावळे

## अनुक्रम

ढवळू नकोस तळ । १, अवस्था : स्वागत । २, अ. रोज इथे । ३, अ. इथे । ४
अ. जेथे सत्य श्रद्धेच्या कुशीत । ५, अ. स्वाधीनता । ६, अ. प्रत्येक झाड । ७
अ. पक्षी । ८, अ. सर्वत्र । ९, अ. ते कधीच झेगावले नाहीत । १०,
अ. स्तोत्र-गान । ११, अ. त्यांना एवढेच ठाऊक । १२, अ. सदय हात । १३
अ. साऱ्या मुठी बेमुर्वत । १४, अ. तेथे कुणीच नसतात दूरस्थ । १५, अ. ते
कधीच खंतावले नाही । १६, अ. संपले न आयु । १७, अ. कशाला । १८
अ. बगळे ते नसते तर । १९, अ. समुद्र । २०, अ. सर्वदूर । २१,
अ. अवकाश । २२, अ. प्रलयपूर्व–प्रलयोत्तर । २३, अ. कालौघ पहा मानव्य
चिरडले जात । २४, अ. जेव्हा विराम पावते । २५, अ. दूरदर्शन । २६,
अ. ज्यांचे सूर्य । २७, इथे । २८, फिरत आहेत । ३०, अजून विद्यमान । ३१
प्रत्येकाचे मनोगत, प्रत्येकाला कळू द्या । ३२, कुणाच्या । ३३, आरंभ
स्वप्ने । ३४, कुठवर झुलवशील । ३५, समृद्धीचे शिल्पकार । ३६, जगू दे
त्याना निवांत । ३७, जागरूक अस, माघारा बघू नकोस । ३८, उगाचच
गाऊ नकोस । ४०, इथे सारे काही वेगळेच । ४२, मी फिरेन । ४४,
म्हातारे मन । ४६, इथे थांबू नकोस, निघून जाशील । ४७, चित्रलिपीतले
चित्रकार । ४८, दर्शनी सौंदर्य म्हणून । ४९, हा बहर माझा नाही । ५०
झुळुक । ५२, अजिंठ्याच्या परिसरात । ५३, जन्मलास तेव्हा । ५४,
प्रश्नोत्तरे । ५६, आज ना उद्या । ५७, आठवेल सारे । ५८, आयुष्य असेच
गेले । ६०, मी कुणी अज्ञात माळी । ६१, सामान्याची उगाच करुणा । ६२,
मी : एक पात्री नाटक । ६३, बघणे झाले नाही । ६४, त्यांना हवे
असतात । ६६, बोधी वृक्ष । ६७, त्यांचे जग । ६८, आनंद । ६९,
कोरडवाहू जमीन इथली । ७०, हा पेला भरूनी घ्यावा । ७१, उगाच । ७२
पार तू बदलून गेला ७३, ते होते तोवर त्यांचे । ७४, शोधतो मी । ७५,
जन्म माझा मी जळावे । ७६, भूक एकच राहिली । ७७, असे क्वचितच
भेटतात । ७८, देव मागे राहिले । ७९, गीत वाऱ्याने टिपावे । ८०.

# प्रस्तावना

श्रीपाद कावळे यांचा हा दुसरा कवितासंग्रह आहे. बर्ट्रांड रसेलने मानवी संबंधाची विभागणी करताना ती तीन गटात केलेली आहे. माणूस आणि माणूस यांच्यातील संबंध, माणूस आणि समाज यांच्यातील संबंध आणि माणूस व निसर्ग यांच्यातील संबंध असे रसेलने कल्पिलेले तीन गट आहेत. ही विभागणी करताना कवी आणि कविता हा विषय रसेलसमोर नाही. कदाचित रसेलने माणूस आणि निसर्ग हा कवितेचा खरा विषय आहे हे मान्य ही केले नसते, पण कवीच्या मनात हीही कल्पना रुजू शकते. कावळे यांचे म्हणणे असे आहे की, कवी आणि निसर्ग हा आपल्या कवितेचा प्रमुख विषय आहे. माणूस निसर्गाच्या सहवासात जगत असतो. हे जीवन जगताना निसर्गाने ज्या प्रतिक्रिया आपल्या मनात निर्माण केल्या, तो या कवितांचा विषय आहे, असे कवीला जाणवते आहे. कवीला स्वत:च्या कवितेविषयी काय वाटते याची ही नोंद आहे. वाचकांना ही कविता वाचताना काय जाणवेल याची नोंद वाचकांनी करावयाची आहे.

निसर्ग हा विषयच थोडा गुंतागुंतीचा आहे. निसर्गाने आपला काही तरी ठसा ज्या मनावर उमटविलेला नाही असे कविमन सापडणे फार दुर्मिळ आहे.

कवी कोणत्याही भाषेतला, कोणत्याही युगातला वा संस्कृतीतला असो, त्याचा आणि निसर्गाचा संबंध आलेला असतोच. अगदी नवे कवी जरी घेतले तरी कविमन निसर्गाला पारखे असू शकत नाही, हे एक सत्य आहे. जाणीवपूर्वक अगर अजाणता निसर्ग हा कविमनाला वेढून बसलेला असतोच, हे एक न नाकारता येणारे असे पहिले सत्य आहे. आणि कविमन ह्या निसर्गाशी एकरूप होत असताना आपले मानवी जीवन सतत निसर्गावर आरोपित करीत असतो. आपले माणूसपण निसर्गात पेरीत, प्रक्षेपित करीतच आपण निसर्ग पाहतो, हे लौकर मान्य न होणारे पण तरीही नाकारता न येणारे दुसरे सत्य आहे. निसर्गाचे चित्रण कवितेत करतानासुद्धा आपण मानवी मनाचेच चित्रण करीत असतो. पाहता पाहता कवितेतील निसर्ग माणसाच्या प्रमाणे दिसू लागतो.

निसर्गचित्रणासाठी जाणारे कवीसुद्धा निसर्ग पाहताना ते निमित्त करून पुन: माणूसच पाहतात; कारण पाहणारा कवी माणूसच असतो. निसर्ग आणि माणूस यांची गुंतागुंत हाच निसर्गचित्रणातील एक प्रमुख विषय असतो. कवींची इच्छा नसतेच; पण जरी त्यांची तशी इच्छा असली तरीही कवींना स्वत:च्या माणूसपणापासून दूर जाणे जमणारे नाही.

पूर्वेची पेठ लुटून, सुवर्णमुद्रांचा वर्षाव करीत प्रविष्ट होत असलेला सूर्य ही केवळ निसर्गातली प्रतिमा असू शकत नाही. सूर्य पूर्वेला उगवतो हे सर्वमान्य आहे. सूर्य उगवताना सगळीकडे प्रकाश पसरतो हेही सर्वमान्य आहे; पण कवितेतील सूर्य नुसता पूर्वेला उगवत नाही–तो पूर्वेची बाजारपेठ लुटून नंतर प्रविष्ट होतो आणि ही लूट करताना समृद्ध झाल्यामुळे सुवर्णाचा वर्षावही करतो.

येथे पूर्वेची पेठ लुटण्याचा उल्लेख आल्याबरोबर सूर्य हा केवळ निसर्गातील सूर्य राहात नाही. त्या सूर्याला माणसाच्या इतिहासाचे संदर्भ जाऊन चिटकतात. कवितेतील पूर्व ही केवळ पूर्व दिशा न राहता त्यापेक्षा काही वेगळी होऊन जाते. हे घडणे अपरिहार्य आहे; कारण ती कविता आहे. माणूस आणि निसर्ग यांच्या अनुबंधावर कविता लिहिणारे कवी सुद्धा माणूस, समाज व निसर्ग यांच्या परस्पर अनुबंधावरच लिहीत असतात.

कवी हा शेवटी निराळ्या प्रकारचा, पण माणूस असतो. आणि हे कवीचे माणूस होणे व असणे सुटे आणि एकाकी नसते. निसर्गाच्या सहवासाबरोबरच

समाजाच्या सहवासातूनही ते निर्माण होते. कवींना कधी निसर्ग विसरता येत नाही; त्यांना समाजही विसरता येत नाही आणि आपण कवी आहोत हेही विसरता येत नाही.

कावळे यांची कवितासुद्धा हे सारे पदर एकत्र करीतच शब्दबद्ध होते. ती निसर्गाविषयीची कविता आहे हे जितके खरे, तितकेच ती समाजाविषयीची कविता आहे हेही खरे आहे. जे जन्मभर तळपता सूर्य माथ्यावरच घेऊन चालले, पायाखाली तप्त वाळवंट आणि माथ्यावर तळपता सूर्य असेच जे चालत गेले आणि ज्यांना खजुरीचे झाड भेटलेच नाही, त्यांचेही एक शोभापात्रच होऊन गेले ह्याची खंत ज्या कवीला वाटते, त्याचे मन केवळ माणूस व निसर्ग इतकाच विचार करीत आहे, असे आम्हा वाचकांना काय म्हणून वाटावे ?

निसर्गसौंदर्य संवेदनशील मनाने टिपण्याचे कवीचे कार्य एका बाजूने सतत चालू असते. हे चालूच राहायला हवे, कारण कवितेचा प्राणच त्यामुळे अस्तित्वात येतो. पण हे संवेदनशील मन सामाजिक संदर्भात मुरलेले असते, हेही अपरिहार्यच आहे. हे सारे सांगताना याक्षणी माझ्या मनात पुरोगामी–प्रतिगामी अशा प्रकारची शिरोभूषणे नाहीत. फक्त स्वाभाविक व अपरिहार्य अशी अनुभवाची बांधणी आहे.

श्री. कावळे यांच्या कवितेत ज्या ठिकाणी समाज जाणवण्याइतपत व्यक्त आहे, ती ठिकाणे आपण क्षणभर बाजूला ठेवू आणि जिथे केवळ समोरच्या सौंदर्यावर कवी मुग्ध व लुब्ध झालेला आहे ती ठिकाणे पाहू. मला तिथेही समाज जाणवतो.

समोर तळे पसरले आहे. सायंकाळ होत आहे. तळ्याच्या सावळ्या कायेवर मधून मधून हिरवे गोंदण दिसते आहे. कमळाची तरंगती पाने आणि लाटा असे हे शांत वातावरण आहे. पण त्याचे चित्रण करताना मध्येच हे तळे निष्पाप आणि निरागस आहे, ह्याची नोंद होऊन जाते. तळ्याचे हे निष्पाप आणि निरागस असणे याचा संबंध समाजाशी असतो. सायंकाळ होतच आहे. रात्रीला फार थोडा अवकाश उरलेला आहे. आता थोड्या वेळात या तळ्याच्या काठावर थकलेल्या पक्ष्यांचे थवे विश्रांतीसाठी उतरतील. आकाशातील अप्सरा सरोवरावर उतरतील. तृषार्त चकोर चांदणे टिपून निघून जातील. थोडक्यात

अशी रात्र येईल, बहरेल आणि ओसरून जाईल. त्यानंतर दवारलेली रेशमी शाल पांघरण्यासाठी पहाट येईल.

रात्रीला रात्रीचे सौंदर्य आहे. पहाटेला पहाटेचे सौंदर्य आहे. ह्या सौंदर्याचे मोल मी मानतो. एखाद्या कर्मठ बोधवाद्याप्रमाणे रात्र संपून जाईल आणि पहाट येईल हा कवीचा आशावाद आहे, असे मी म्हणणार नाही. कारण येथे रात्र ही चांदणी रात्र आहे. तिच्या कुशीत थकलेल्या पाखरांना झोप आहे आणि या रात्री अप्स-रांचा विलास आहे. ही रात्र संपणे व पहाट येणे, म्हणजे निराशा संपून आशेचा उदय होणे नव्हे, इतके मलाही कळते. रात्रीची पहाट होताना या कवितेत आपण एका सौंदर्याकडून दुसऱ्या सौंदर्याकडे जातो असे मला म्हणायचे आहे. एका सौंदर्यात शांत गहिरेपणा आहे, तर दुसऱ्या सौंदर्यात ओलसर उल्हास आहे. लगेच दुसऱ्या बाजूने वळून, ही कविता प्रतिगामी स्थितिवादी आहे असा शिक्का मी मारणार नाही.

या कवितेत वारंवार, तळ ढवळू नकोस अशी सूचना आहे. तळापासून सारे ढवळून काढल्याशिवाय क्रांती कशी होणार ? तळ ढवळू नका म्हणजे काय ? हा स्थितिवाद आहे असे मी म्हणणार नाही; कारण या कवितेतील तळे समाज नव्हे. ते कवीचे स्वतःचे मन आहे आणि तळ ढवळल्यानंतर नेहमी क्रान्तीच होते असेही नाही. फक्त वासनांचा गाळही उसळतो. म्हणून मी कवितेचा आस्वाद घेताना पुरोगामी–प्रतिगामी हे शब्द बाजूला ठेवायला तयार आहे; पण तरीही समाज जाणवतो. सामाजिक जाणीव म्हणजे फक्त सामाजिक क्रांतीची व परि-वर्तनाची जाणीव, एवढेच नसते. मुळात हे सौंदर्य कोणतेही विघ्न न येता निर्वेध-पणे मला आस्वादिता आले पाहिजे–हा माझा अधिकार आहे ही जाणीवच सामाजिक आहे.

समाज या घटकाला मी इतके महत्त्व देतो आहे, याला कारण आहे. कवि-मनाचे व्यक्तिवैशिष्टय–त्या मनाची संवेदनक्षमता मी गौण समजत नाही. तो तर कवितेचा प्राण आहे. पण या प्राणाचा विचार करता करता आपण एका चुकीच्या वर्गवारीकडे नकळत जात असतो. त्या वर्गवारीला अभ्यासाची सोय म्हणून मीही शरण जाईन; पण तत्त्वतः ही वर्गवारी मिथ्या आहे, असे मला म्हणायचे आहे. उगीचच आपण असे म्हणतो की, अमुक या कवीच्या सामाजिक जाणीवा फार तीव्र आहेत. एखाद्या कवीविषयी आपण म्हणतो की, हा सामा-

जिक जाणीवेचा कवी नसून आत्मनिष्ठ कवी आहे. अजून एखाद्या कवीविषयी आपण म्हणतो, हा समाजाविषयी उदास आहे. या सगळ्या अभिधानांना फार मर्यादित अर्थ आहेत. कवी सामाजिक मनाचा असतोच. परिवर्तनाच्या दिशांचा आग्रह कुठे बलवान असतो; कुठे नसतो, पण सामाजिकता म्हणजे परिवर्तनाचा आग्रह इतकेच नसते. मला समाजाशी कर्तव्य काय, असे म्हणणाऱ्या कवीची जाणीवही सामाजिक असते.

कावळे यांची कविता सतत माणूस आणि निसर्ग यांच्या परस्पर बंधात गुंतलेली आहे. म्हणजे काय आहे, तर व्यक्तिमनाच्या सर्व वैयक्तिक, सामाजिक जाणीवा निसर्गात पेरून त्या निसर्गाचे चित्र काढणारी ही कविता आहे. सामाजिक जाणीवांच्यासह ही कविता निसर्गात जात असल्यामुळे मानवी संस्कार नसलेला सहज निसर्ग आणि माणसांनी संस्कारित केलेला निसर्ग या दोहोत कोणता भेद करण्याचे कारण कवीला वाटत नाही. घनदाट अरण्यातून चालत आलेली पाउले शीतगंभीर जलाशयाच्या काठावर स्थिरावतात. या जलाशयाच्या काठावर एक फाटका ध्वजही फडफडत आहे. माणसांनी न बनविलेले अरण्य आणि माणसाने निसर्गाला गरजेचा आकार देऊन बनविलेला ध्वज या दोन्हीकडे कवी निसर्ग म्हणून तर पाहतोच, पण दगडात कोरलेले वाऱ्याचे ध्वनिरम्य सूर नोंदविताना तो दोन्ही प्रकारचा निसर्ग आपल्या अंतःकरणाचा प्रतिनिधी म्हणूनही न्याहाळून घेतो. कावळे यांच्या अनुभव घेण्याच्या या पद्धतीचा सगळ्यात ठळक परिणाम असा झाला आहे की, कविता रूढार्थाने सामाजिक नाही. तशी ती निसर्गकविताही नाही. आणि तिला आशा–निराशावादी अगर पुरोगामी–प्रतिगामी म्हणणेही शक्य नाही. परस्परविरोधी ताण एकत्र गुंफणारी आणि अनेक पातळ्यांच्या वर एका क्षणी राहू इच्छिणारी अशी ही कविता आहे. ती फारशी दुर्बोध होत नाही, हीच नवलाई म्हणून सांगणे भाग आहे.

श्री. कावळे यांच्यासारखा कवी मध्येच बगळे ही कविता लिहितो. ह्यासारखी कविता वाचताना वाचकांना थोडे गोंधळल्यासारखे होणार याला इलाज नाही. बगळा हा ढोंगीपणाचे प्रतीक म्हणून इतका प्रसिद्ध आहे की, तो एक पक्षी आहे व प्रतीक म्हणून न राहता तो आपल्या खऱ्याखुऱ्या स्वरूपात कवितेत येऊ शकतो, हे चटकन समजून घेणे सोपे नाही. या कवितेत खराखुरा बगळा पक्षी म्हणून येतो. मोहाची लाल–फुले पाहूनसुद्धा न लोभावणारे व

कीटकांचा नाश करीत रानोमाळ भटकणारे बगळे कवितेत अगदी अपरिचित वाटतात. ते अपरिचित आहेत म्हणूनच खरे बगळे आहेत, एरव्ही जे परिचित आहेत ते खोटे बगळे म्हणूनच प्रसिद्ध आहेत.

श्री. कावळे यांच्या कवितेत इतरांच्या छटा फार थोडया आहेत. बरी–वाईट, जी काही–जशी काही आहे, ती त्यांची कविता स्वत:सारखी आहे. ही कविता वाचून इतर कुणा ज्येष्ठ कवीची आठवण व्हावी, असे प्राय: घडत नाही; पण क्वचित काही ठिकाणी हे घडते. " कालौघ पहा मानव्य चिरडले जात ' ही अशी कविता आहे. कुसुमाग्रजांची आठवण झाल्याशिवाय ही कविता वाचलीच जाणार नाही. इतर ज्येष्ठांच्या आठवणी होणार नाहीत, याची काळजी कवीने घेणे आवश्यक असते. पण नजर चुकवून असे काही प्रतिध्वनी मूळ ध्वनीत सरमिसळ होत असतात. ह्याबाबत कवींनी दक्ष राहिले पाहिजे.

कावळे यांची कविता निसर्गाशी बांधलेली आहे हे मान्य करताना मी या कवितेतील सामाजिकतेकडे मुद्दाम लक्ष वेधले; पण सामाजिकता हा घटक या कवितेत दरवेळी नवे नवे रूप घेऊन येतो याचेही भान असणे आवश्यक आहे. समोर असणारे सर्व प्रश्न आपणास कळलेले आहेत आणि त्यांची निश्चित उत्तरेही आपणापाशी आहेत, या निश्चितपणापासून या कवितेचा जन्म होत नाही. प्रत्येक प्रश्नाकडे वेगळया पद्धतीने पाहण्याचा छंद या कविमनाला आहे. म्हणूनच जर नवे देवूळ बांधता येत नसेल आणि ओंजळ रीती असेल तर जुनी देवळे पाडावीत का, हा प्रश्न उभा राहतो. चिघळत्या जखमांचे चित्कार तर जागरूकपणे ऐकलेच पाहिजेत. पण इतिहासजमा दुष्टाव्याचा मागोसा घ्यायचा नाही, भूतकाळात गुंतायचे नाही म्हटल्यावर जे शतकाचे सलणारे काटे असतात त्याचे नेमके अर्थ कसे कळणार? मध्येच कवी सांगतो, माणूस जोपासणारे हातच जर दिसत नसतील तर वाळवंटातील खजुरांचे मनोगत तेथे सांगावे काय? तृषार्त उंटाच्या दीर्घकथा तेथे सांगाव्यात काय? बर्फनगरीतल्या निष्पर्ण झाडांचे स्पंदन सांगावे काय? या प्रश्नांचे आपण तरी उत्तर काय देणार? कारण ज्यांना गरज नाही त्यांना सांगून उपयोग नसतो आणि ज्यांना माणूस जोपासणारे हात असण्याची गरज वाटत नाही त्यांनाच वाचविण्यासाठी सारे सांगणे ही आपली गरज असते. म्हणून कुणी ऐको वा न ऐको, प्रत्येक दारावर थाप मारीत–ठोठावीत हिंडणे भाग असते.

हे मन पराधीन आहे. त्याला उत्तरे जवळ असूनही सापडत नाहीत. आपलेच प्रश्न आपल्याला प्रश्नचिन्ह बनून वाकुल्या दाखवित असतात. अशा वेळी नेमके काय होते ? काय व्हावे ? कवीने ह्याचे उत्तर दुहेरी दिले आहे. जेव्हा सोबत कुणीच नसते तेव्हा सावल्या अंधाराच्या स्वाधीन होतात, हे पहिले उत्तर आहे तर अशावेळी एकटी दिवलाण दिवस उगवण्याची वाट पहात एकटीच तेवत असते, हे दुसरे. ह्या दोन्ही उत्तरांत आपआपल्या कक्षेत सत्यता आहे, अर्थ आहे. पण एकच एक उत्तर मात्र निरर्थक आहे.

अजून मला आवडलेल्या एका कवितेविषयी चार शब्द लिहिले पाहिजेत. मी जी संमिश्र, अनेक पातळीवरची व अनेक पदरी जाणीव म्हणतो ती या कवितेत अतिशय तलम होऊन उतरलेली आहे. 'आयुष्य असेच गेले' हे या कवितेचे शीर्षक आहे. एवढे शीर्षकच आपण वाचले तर त्याचा अर्थ सरळ व स्पष्ट आहे. करायचे होते ते करता आले नाही. टाळायचे होते ते टाळता आले नाही. सर्व आयुष्य हे असेच निरर्थक गेले आणि शेवटी सगळ्या आयुष्याचा अर्थ काय उरला तर रिती ओंजळ. कवीला नेमके हेच म्हणायचे आहे, अशी मात्र माझी खात्री नाही. काळोखे आकाश पाहण्यातच आयुष्य गेले असे तो म्हणत नाही. तो सांगतो, नृत्य सरल्यानंतरचे चंद्रहीन आकाश मी बघत आलो. प्रकाश-हीन आंधारलेले जग ही निराळी जाणीव आहे आणि नृत्यहीन, चंद्रहीन जग ही निराळी जणीव आहे. पहिल्या ठिकाणी निराशा आहे. दुसऱ्या ठिकाणी फक्त उल्हासाचा अभाव आहे आणि या दोन जाणीवांच्या मध्ये एक आणखीही सूक्ष्म जाणीव आहे व गुंतागुंतीचीही आहे. बरसल्या धारांच्या मध्ये भिजलो नाही, किनारे भेटलेच नाहीत, हे सांगताना कवी सांगतो, आयुष्य भटक्या ढगासारखे गेले. हे शरद ऋतूतील भटके ढग स्वतःच एक सौंदर्य असतात आणि काळ्या वातावरणात नसतात–निळाईतून वावरत असतात. उसळत्या लाटावर झेपावलो नाही, ही खंत आहे हे खरे; पण जन्म गेला कसा–तर किनाऱ्यावर बसून लाटांचे सूर टिपीत गेला. नुसताच वाळू तुडवीत गेला नाही. बेभान व्हावे व जन्म सार्थक झाला, असे वाटावे या जातीचे काही घडले नाही, हे तर खरेच; पण अभ्राप्रमाणे भटकलो, लाटांचे सूर टिपले, हेही खरे. थोडक्यात यापरीस औदासीन्य किती पदरी व किती पातळ्यावरील म्हणून उकलून दाखवावे ? या व्यामिश्र, अनेक-पदरी गुंफणीमधूनच या कवितेचे सौंदर्य आहे. कवीला हे जमते तेव्हा त्याची कविता सोन्याची असते. हे जमत नाही तेव्हा जरतारी असते.

श्री. श्रीपाद कावळे यांची कविता आता बाल्य संपवून ऐन वैभवात आलेली आहे. तिला स्वतःचा सूर सापडलेला आहे, स्वतःची शब्दकळा सापडलेली आहे.

या उंचीवरून ती किती प्रवास करते व याही वरील झेप केव्हा घेते, ह्याची प्रतीक्षा कवितेचे खरे रसिक करीत राहतील. रसिकांनी प्रतीक्षा करीत थांबावे हे भाग्य कवीसाठी लहान नसते.

डिसेंबर १९८१
५६, भाग्यनगर, नांदेड

—नरहर कुरुंदकर

## ढवळू नकोस तळ...

ढवळू नकोस तळ जरा थांबून जाशील
कमलपत्रांकित पृष्ठावर तरंगते सौंदर्य
सावळ्या कायेवर हिरवे गोंदण
निष्पाप तळे, निरागस भाव टिपून घेशील.

थोडाच अवकाश
श्रान्त पक्ष्यांचे थवे उतरतील किनाऱ्यावर
जरा थांब, येईल रात्र
आकाशातील अप्सरा येतील सरोवरावर,
येतील दूरान्तरे कापीत तृषार्त चकोर
चांदणे टिपून निघून जातील
ढवळू नकोस तळ, जरा थांबून जाशील.

जरा थांबून जाशील सरेल रात्र, येईल पहाट
ढवळू नकोस तळ,
दवारलेली रेशमी शाल पांघरून जाईल.
ढवळू नकोस तळ, जरा थांबून जाशील

☐

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# अवस्था : स्वागत

पूर्वेची पेठ लुटून
सुवर्ण मुद्रांचा वर्षाव करीत
प्रविष्ट होत
पहाटेचे तलम वस्त्र सारीत दूर
गर्भ रेशमी रश्मिजाल झाकून जात

रात्रीच्या कठोर बाहुपाशात
व्याकुळलेले अंतरंग
उकल पावत, भिजून जात
केशरी प्रभेत
भरून जात आसमंत
रोज नव्या आवर्तनाचा पाऊल-प्रवेश
रोज स्वागत
सनईचे ध्वनिरम्य सूर
आळवीत विहगवृंद
फुलारलेले वृक्ष तुरे खोवून
उभेत
स्वतःच शृंगारलेली आरास
रोज स्वागत
नव्या आवर्तनाचा पाऊल-प्रवेश.

□

## अवस्था : रोज इथे....

सुसज्ज क्षितिजे सभोताल तट
आकाशाचे छत्र धरेवर
सर्वांगीण संपन्न अवस्था
निर्भर अविचल अपूर्व वास्तव
गस्त घालतो त्रिकाळ वारा.

युगे युगे आधिपत्य जागते
युगे युगे सूर्याचे स्वागत
रोज इथे वाऱ्याचे संगीत
पहाड पाझरती स्वेच्छेने
एकत्वातून अनेकत्व घे जन्म
उमलते भाव सुनिश्चळ
रोज इथे पक्ष्यांचे गाणे
तरुलतिकांचे सुखसंवेदन
काया कुसुमित अपूर्व मीलन
.... .... .... ....

इथे बांधली जाते पूजा
आपुले पूजन–स्वयेच वंदन
हात आपुले, झरती डोळे
अपुल्यासाठी अपुले स्पंदन.

□

## अवस्था : इथे

इथे ऋतूंचे फुलते वैभव
उन्हात पिवळ्या हसते स्वाती
उगाच पाझर, काजळ डोळा
अंधाराच्या वळती वाती—

तुडुंबले घट अमृतधारा
इथे आमुची रोज पर्वणी
कशा शोधशी दिशान्त सौरभ
विश्वव्यथेची उगाच गाणी.

इथे कोरडे पात्र नद्यांचे
वृथा कशाला समुद्रमंथन
ग्रहगोलांचे शोध अधान्तर
शोध तुझ्या आत्म्याचे स्पंदन.

□

## अवस्था : जेथे सत्य श्रद्धेच्या कुशीत

घनदाट अरण्यातून चालत आलेली पावले
स्थिरावतात,
एका शीत गहनगंभीर जलाशयाच्या काठावर
जेथे वैराण अस्तित्वहीन वास्तव्य
एक फाटका ध्वज फडफडत
निःशब्द गौरवीत महाप्रस्थान
निर्भर अवस्था—अनादी जागरण
आमरण उभे साकृत सत्य
दगडात कोरलेले
वाऱ्याचे ध्वनिरम्य सूर सभोताल
जेथे सत्य श्रद्धेच्या कुशीत निर्भर
काळाचे कठोर हात पोहचले नाहीत तोवर.

□

## अवस्था : स्वाधीनता

पूर्वेच्या झरोक्यातून प्रातःकालीन एक नजर
शैलशिखरावर वितळते बर्फ
आसमंत भिजून जात
उतरणीवर अर्धवट उगवलेली बीजे
जीव धरत
प्रारब्ध–पर्जन्यावर निर्भर
उल्लसित अंतर्बाह्य
उगवतीचा प्रथम स्पर्श
बाभुळवनेही हसत
पतझडीत रानेही हसू लागत
झेल झेलीत
पेटते वैशाखही नतमस्तक
पळसपुत्रांच्या ओंजळीतले
शेंदरी फुले पाहून
कळ्यांचे उमलते निःश्वास गंधित श्वसन
मीलनोत्सुक स्पर्शगंध ....    ....

□

## अवस्था : प्रत्येक झाड

प्रत्येक झाड सुखाधीन वल्कले पांघरून
बदलत्या ऋतूंचे बदलते मोहर
शांत शीत झऱ्याच्या काठावर, हिरव्या गर्द झाडीत
विश्रामगृहे शीत छायांकित
आयुष्य भारावलेले बंधमुक्त
प्रत्येकाची प्रत्येकावर कोवळी नजर
फुलपाखरे विहरतात रानोमाळ
प्रत्येकाचे हात प्रत्येकात
गुरेही टेकडीच्या उतरणीवर
लसलसत्या हिरवळीवर
सुखे नांदत शिवारावर
गुराख्याची प्रेमळ नजर

क्वचितच विव्हळले असतील
घायाळ झाले असतील
पारध्याच्या जाळ्यात क्वचितच
अडकले असतील....

□

## अवस्था : पक्षी

ऋतूंच्या बदलत्या पावलावर नजर ठेवून
पक्षी भरारतात उल्लंघून कटिबंध,
निघून जातात
कुण्या सुखद छायांकित शीत प्रदेशात.
ते अडकले नसतात मोहबंधात
स्थलकालाच्या बेगडी बंधनात
पल्याडच्या डोंगरउतरणीवर,
अनामिक वृक्षछायेत विसावा घेत
कुण्या सरोवराच्या काठावर,
उल्लंघून अरण्ये कुण्या माळरानावर
जीव लावीत, कुण्या गर्द झाडीत
पक्ष्यांचे थवे गात बदलत्या ऋतूंची गाणी.

□

## अवस्था : सर्वत्र

सर्वत्र वासंतिक उन्हे
अंगावर हिरवा साज
फुलून येत अंग अंग
डेरेदार वृक्ष उभेत
शाहिरी थाटात
शीळ घालीत येत वात
कुणाची मंजुळ लावणी गुणगुणत
कुठून सांडली हळद कुणास ठाऊक
टवटवलेले मुग्ध यौवन
लतिकांचे सान हात
गुरफटलेले एकमेकात
उन्हसावल्यांचे खेळ बघत....

□

# अवस्था : ते कधी झेपावले नाहीत....

ते कधीच झेपावले नाहीत उत्तुंग शिखरावर.

कुण्या झाडाच्या कुशीत निर्धास्त आजन्म उतरणीवर
चिवचिवणाऱ्या चोचीतले बोल टिपीत
पिलांचे बाळसे गोंजारीत
न्याहाळीत निळे आकाश कुण्या हिरव्या डहाळीवर
ते कधीच झेपावले नाहीत उत्तुंग शिखरावर—

पहाटपूर्व दवारलेली धरा
चुंबून घेत पक्ष्यांचे थवे
रुणझुणते चित्रमयी नृत्य
पिवळ्या उन्हात झळझळणाऱ्या रेशमी तृणावर
ते कधीच झेपावले नाहीत उत्तुंग शिखरावर—

आजन्म रानफुलांची सोबत
दूरवर पसरलेले विस्तीर्ण प्रदेश न्याहाळीत
आपल्याच घरट्यात आपलीच ऊब पांघरून
ऊन-सावल्यांचे खेळ बघत आयुष्यभर
ते कधीच झेपावले नाहीत उत्तुंग शिखरावर—

आजन्म अंतरे राखीत अंतरे जोडीत
शिवारावर उतरलेल्या पक्षिराजाचे स्वागत करीत
ते कधीच सरसावले नाहीत पुढे
कधीच तुटून पडले नाहीत
पिवळी पैंजणे घालून विहरणाऱ्या कबुतरांवर

....त्यांच्या नजरा कधीच नव्हत्या राजरस्त्यावर
ते कधीच झेपावले नाहीत उत्तुंग शिखरावर.

□

## अवस्था : स्तोत्र-गान

परतणाऱ्या संध्येला निरोप देत
विसावतात वृक्षवेली रात्रीच्या कुशीत
केवळ श्वसन झाकून घेत देह
स्वप्नांच्या तलम वस्त्रात
रात्रीच्या गहनगूढ अंधारात—

दिवसभर चिवचिवणारी पाखरे
चोची मिटून निःशब्द घरट्यात
वाराही विमुक्त घेत विश्राम
कुण्या झाडीत कुण्या झुडपात
रात्रीच्या गहन गूढ अंधारात—

पहाटेचा प्रथम प्रहर
उकल पावत हळुवार पदर सारीत
पुन्हा चेतन-दहिवरात भिजून जात
विहंगांचे स्तोत्र गान, सुजलाम् सुफलाम्
पहाटेच्या तलम रेशमी प्रकाशात—

□

# अवस्था : त्यांना एवढेच ठाऊक

त्यांना नसतात मोरपंखी अपेक्षा
आयुष्य भार होईल असे काहीच नसते
स्वहस्ते बांधलेली घाटदार घरटी
ओंजळीत मावेल एवढेच
दाणे टिपीत, पिलांना भरवीत
या फांदीवरून त्या फांदीवर
स्वेच्छेने उडत असतात
उन्हे उतरणीस परत येत
पिलांना कुशीत घेत.

त्यांना ठाऊक नसतात, भास नि आभास
त्यांना एवढेच ठाऊक, प्रत्येकाची वेगळीच वाट
प्रत्येकाचे नसतात सारेच घाट
त्यांना एवढेच ठाऊक, पंखाना वाऱ्याची साथ.

□

## अवस्था : सदय हात

धरित्रीच्या कुशीत बीजे जीव धरत, पालवून जात
उतरणीवर, पहाडीवर, खडकाळीत खालानात
भरून येत अंतरंग बहिरंग फुलून येत
देणाऱ्याचे, घेणाऱ्याचे जेथे सदा जुळतात हात.

पवन येत साद घालीत कोवळी उन्हे ऊब देत
सर्दावलेले आसमंत जिव्हाळ्याने झाकून जात
कुणीच नसतात अव्हेरलेले, दुर्मुखलेले
अंगावरून फिरत असतात प्रातःकालीन सदय हात.

□

## अवस्था : साऱ्या मुठी बेमुर्वत

वैशाख वाऱ्यात करपलेले प्रौढ वृक्ष वस्त्रहीन
झाकून घेत लतावेलींचे गणगोत कोवळे हात
शैशवाने वार्धक्याला दिलेले अभयदान
अरे बघ ! उघड्यावरती झाकलेली वस्तुजात.

पहाडीही झाकून घेत तृणे, हिरवी शाल
कुंपणेही त्रस्त रानफुले माळून जात
नद्यांनाही एकटेपण कधीच जाणवले नाही
पात्रांनाही काठावरच्या झाडाची सतत साथ.

इथे असेच जगावे लागते निष्प्रेम जीवन
इथे श्वास कोंडलेले, उकलता उकलत नाही
इथे कुणालाच झाकायला तयार नसतात हात
साऱ्या मुठी बेमुर्वत उघडता उघडत नाहीत.

□

## अवस्था : तेथे कुणीच नसतात दूरस्थ

अरे ही घनदाट अरण्येही बघ
झाकून घेत धरेचे अंतरंग
अनंत अंतर्मनाची मोहनमाळ
हिरवा चुडा–पिवळे लखलखते सौंदर्य
गळ्यात गळा घालून प्रत्येक प्रत्येकात विलीन
तेथे कुणीच नसतात दूरस्थ
वाळीत टाकलेले .... .... ....

अस्ताचली सूर्य,
निवांत निद्रिस्त–प्रत्येकजण प्रत्येकाच्या कुशीत
झरेही शांत–निःशब्द–भावसंगीत गात
पाखरेही निवांत घरट्यात
श्वापदे गिरिकुहरात.

रोज एक उमलते पर्व
वेलीही विसावतात, निर्धास्त
कुण्या वृक्षाच्या खांद्यावर
अम्लान कळ्या कुशीत घेऊन
कधी कांबळं पांघरून
तर कधी चंद्रोदयी कलाबतुची शाल पांघरून.

□

## अवस्था : ते कधीच खंतावले नाहीत

डगमगली नाहीत क्षितिजे उसवले नाही आकाश,
उन्हाच्या तप्त झळात वृक्ष पेटले नाहीत
वादळी वाऱ्याची घोडदौड, उन्मळून पडले नाहीत
उभे निश्चल । भ्रान्तहीन । तसूभर हटले नाहीत.

आकाश घनांनी तुडुंबलेले आकाश भरभरून
हुरळून गेले नाहीत, हात उंचावले नाहीत
सुखदुःखाचे येणे जाणे सतत बघत राहिले
हर्ष खेदाची कोणतीच कळा, मुखावर उमटली नाही.

पल्लवांनी झाकलेले आजन्म हिरवाळलेले
आजन्म ऋतूचे स्वागत कधी खंतावले नाहीत
भुईशी संलग्न घट्ट रुतलेले पाय भूगर्भ
सातत्याने जागत आले—तसूभर हटले नाहीत.

□

## अवस्था : संपले न आयु

वृक्षांना आलिंगन वेलींचे बहर नवे
ओच्यातील गारव्यात भिजलेली अजुन फुले
नजरेतील ओलेपण, ना सरले ना सुकले
आतुरले अंतर्मन, ओंजळीत भिजलेले.

अजून येत पक्ष्यांचे रोज थवे बहरावर
घर आंगण एक सदा आनंदे भरलेले
पक्ष्यांची घरटी इथे वात्सल्ये फुललेली
वार्धक्यावरती बाल्य नित्य नवे सजलेले.

अजून संपले ना आयु वृक्ष अजून वठलेला
हा मांडव वाकला न, अजुनी नित्य सजलेला.

□

## अवस्था : कशाला

कशाला भ्रष्ट वाऱ्याची नजर चुकवीत
उभेत वृक्ष बहर घेऊन
कशाला उभ्यात रानवेली तोल सांभाळीत
फुलाचे गजरे बांधून
कशाला उभेत पर्वत सरोवरे किनारून
डोईवर चंदेरी किरीट घेऊन
कशाला प्रवाहीत नद्या सातत्याने
पात्र भिजवीत काठावर नजर ठेवून
कशाला जगतात सारे
अंगभूत सामर्थ्य पणास लावून
कशाला जगतात योगी अरण्यात
एकान्त साधून
पशुपक्ष्यांच्या सोबत, धुनी पेटवून.

□

## अवस्था : बगळे : ते नसते तर

मोहाची लाल फुले पाकळ्यातला मधुकंस
मोत्याची भरघोस पिके, बगळे लोभावले नाहीत
द्राक्षाच्या कमनीय बागा, फळांनी झाकलेले वृक्ष
आजन्म भुईशी संलग्न, आकाश धुंडाळले नाही.

कीटकांचे विषारी दंश–विनाशाची कुळे शोधीत
दुष्टाव्याचे उत्खनन, हालाहल शोषून घेत
रानोमाळ फिरत असतात, पिवळी जर्द चोच घेऊन
नुकतीच उमललेली रोपे, जीव धरून बाहेर येत.

ते आहेत म्हणून तर, बागा फुलारून येत
ते नसते तर आयुष्य वैराण झाले असते
ते आहेत म्हणून तर, पक्ष्यांची रोज जत्रा
रसिक राज भृंग्यांचे मुग्ध भाव उमललेच नसते.

ते आहेत म्हणून तर हंसाची मिरासदारी
काठावर वृक्षराजाचे चेहरे उजळले नसते
ते आहेत म्हणून तर आरसेदार सरोवरे
ते नसते तर आयुष्य वैराण झाले असते....

□

## अवस्था : समुद्र

क्षितिजाचे भर्जरी काठ
चंदेरी समुद्र
भूसंपन्न कोट्यावधी लाटांचे बलिष्ट हात
दूरवर पसरलेले अफाट स्वामित्व
डौलदार नावांची फडफडणारी शिडे
लहरत्या लाटांवर, ध्वनिरम्य सूर नादावलेले
सार्थ संगीत........
समुद्र धुंदावला नाही....

तळाशी मौक्तिकांचे भरघोस खच
फुलारलेले फुलोर
तरंगत्या माशांचे अगणित संसार
अंतस्थ पाचूचे वृक्ष........
समुद्र वेडावला नाही....

एवढे प्रचंड बाहुबल
आमरण कक्षाबद्ध
पौर्णिमेची वाट बघत
आमरण जागरण
पितृव्रत किनाऱ्याची ओढ........
समुद्र धुंदावला नाही....

□

## अवस्था : सर्वदूर...

सैल होत
क्षितिजाचे घट्ट हात
ढवळून निघालेला समुद्र प्रचंड वादळी वाऱ्यात
हेलावतात गल्बते
दीपस्तंभ डोळे मिटून बघत
दिशाहीन अस्तित्व
एक कल्लोळ, एक काहूर, एक भ्रान्त
सर्वदूर····

विझलेल्या दिव्याची एक काजळी रात्र
काळजाला हात घालीत
विजांचे अक्राळ विक्राळ हास्य
अस्थिर अवस्था
डगमगते स्थैर्य
विनाशाचे सर्पवत हात
सर्वदूर····सर्वदूर····

अंतरे फाडीत जात बीभत्स सूर
भयाण भुयारातून चालणारी अबोल वाट
अंधाराला अंधार सोबत
अधान्तराला आधार अधान्तर
प्रदेशचे प्रदेश नग्न
एक अवकाश, कंपायमान वज्रभेदी
सर्वदूर ··· सर्वदूर····सर्वदूर····

□

## अवस्था : अवकाश

जेव्हा सूर्य मुक्कामावर परत जात
तेव्हा एक गडद अंधार दिशाव्याप्त
नष्ट होत जात प्रकाशाचे प्रकाशत्व
केवळ अवकाश....शून्याकार अस्तित्व
धरेवर पाय रोवून उभा स्थितप्रज्ञ
हातात आकाश आवळून
हलत्या क्षितिजाचे स्तंभ
ढळणारा तोल सांभाळीत
उद्याच्या सूर्याची वाट बघत
निरपेक्ष
एका अपरंपार निष्ठेचे सतत जागरण.

□

## अवस्था : प्रलयपूर्व—प्रलयोत्तर—

बघ दिशान्त घनगर्जन....खंड खंड विकल गात्र
दुर्मुखले वंचित जे....पृथ्वीचे आर्तगीत
कोलाहल भीषणतम, प्रलयरुद्र हुंकारित
भूप्रदेश कंपित, हो. अंतर्मन पेट घेत....

प्रलय धुंद वाऱ्याचे बाहुबल उच्छेदित
खंड खंड हो विदीर्ण शोकाकुल
ये पुनश्च जलधारा जीर्ण दशा नष्ट होत
काळावर सुकलेले येई पुन्हा पालवीत.

ये पुनश्च स्वर्णकांती तेजोमय सृष्टी हसत
अतिरंजित हसत आज अंग अंग फुलुन येत
नवनिर्मित सृजनभाव मावळते सूर्य येत
नवप्रभात नवनूतन, आशयघन उदित होत.

□

## अवस्था :
## कालौघ पहा मानव्य चिरडले जात

धावती नभातुन सहस्र भूवर धारा
पर्जन्य प्रलय हो अन् गारठला वारा
उन्मळून पडले वृक्ष असंख्य महान
आकंठ बुडाली झाडे–झुडपे–रान
उंचावर हिरवळ मस्त मजेने गात
कालौघ पहा मानव्य चिरडले जात—

शर अगणित सुटती भात्यातून नभाच्या
नेत्रातुन फुटती धारा विद्ध धरेच्या
कापरे भरे अंगात बिचारी श्रान्त
पाखरे भयभरे उडती उंच नभात
उन्मत्त श्वापदे घुरती गिरीकुहरात
कालौघ पहा मानव्य चिरडले जात—

पेटले धरेचे ह्रदय उठे काहूर
धुरकटले माझे नेत्र भरे अंधार
धगधगते अंतर जळती अनल ज्वाळा
ओसंडत गात्रागात्रातून उमाळा
मी कुठूनी गाऊ गीत नवे अभिजात
कालौघ पहा मानव्य चिरडले जात.

□

## अवस्था : जेव्हा विराम पावते

जेव्हा विराम पावते
स्वयं अस्तित्व
उज्वलतेच्या दुग्धसागरात मन धुऊन निघते
एका विश्वव्यापी धारणेने भारावलेले
स्वयं प्रकाशित सूर्यासारखे प्रज्वलित अस्तित्व
आणि त्रिगुणात्मक सत्य जागे होत
निभ्रान्त मन अवकाशाहून नितळ
फिरत दिशा कवटाळीत
तेव्हा दृष्टीला पंख फुटतात.

जेव्हा प्रत्येक प्राणिमात्रावर फिरलेले हात ओलावतात
प्रत्येक अणूतली जाणवते ऊब
प्रत्येक जीव एक आत्मा—एक आकार
एका परम भावनेने उत्कर्षित झालेला महामानव
ज्यांच्यावर सूर्यानेही पांघरावी रश्मिशाल
प्रबोधन गावे.

जेव्हा विस्मृत होत जात लक्षावधी हात
केवळ स्वयं जागा होत
अहंकारी,
आपल्या तळहातावरचे हस्तसामुद्रिक बघत
एकटाच फिरत स्वतःच्या शोधात
जेव्हा तो स्वतःशीच बद्ध होत जात
तेव्हा खचू लागतात भिंती व्यवस्थेच्या
अवस्थेच्या दारूण अंधारात
तेव्हा काळोख पुढे सरसावतो
विनाशाचे हात घेऊन
जेव्हा अवस्थेचे श्वास रोखले जात.

□

## अवस्था : दूरदर्शन

सारी हयात एक शिल्प
दिशांनीही अंतर राखावे
एवढे प्रचंड हात
उत्तुंग आकाशभेदी
निर्गुणातून सगुण शोधणारे
सत्यशोधक
शब्दांकित पांडित्याच्या दूर
विनाशावर सक्त नजर
दिशांना धुवून टाकणारे सूर्यगीत
कणाकणात चैतन्य ओतीत
स्थिरावल्या नव्हत्या नजरा
सोनेरी कळसावर
नव्हते केवळ आत्मकथन
केवळ कलात्मक आविष्कार
गूढ गुंजन
प्रत्येक शब्द, एक अनुभव,
एक सत्य.

□

## अवस्था : ज्यांचे सूर्य

ज्यांचे सूर्य क्षितिजाच्या पल्याडचे
कित्येक कोस दूर
स्वयंप्रकाशित
पावन पाय
भुईशी संलग्न
दिशांना गती देत
पोचणार नाहीत तोवर
तुझे खुजे हात
तुझ्या किरमिजी डोळ्यांची उघडझाप
प्रकाशाचे धूसर अस्तित्व
स्वत:लाही बघू न शकणारे
तुझा प्रकाश तुझ्यामाझ्यात संपणारा
भोवळ आलेल्याची भ्रमिष्ट वाटचाल
जेथे प्रत्येक पाऊल—एक वाट
रोज सूर्याला अर्घ्य देणारे उंच हात
तुला गवसणार नाहीत त्या वाटा
हातास लागणार नाही सत्य
पोहचणार नाहीत तेथे तुझे हात
जेथे सूर्यानेही टेकावेत हात
आणि मागावा अंत
सायंकालीन ज्वलंत अस्तित्व
ज्यांचा प्रत्येक शब्द
अर्थगर्भ .... ....

□

## इथे...

कुणी मुक्तीचा मंत्र देऊन जात नाही तोच
आम्ही बंधने टाकून जात
प्रयासाने लावलेल्या कुणी पणत्या
कुणी फुंकर घालून विझवून जात.

मार्गस्थ झालेले रथ शैलशिखरावर
धावणाऱ्या वाटांचे ठसे अस्पष्ट होत
एका निरामय अवस्थेच्या आधारावर
स्थिरावलेली व्यवस्था कोलमडून जात.

इथे दीपस्तंभ जागते असूनही वाटा दिसत नाही
इथे वाटा असूनही लक्ष्य दिसत नाही
इथे लक्ष्य असूनही गाठले जात नाही
कुठवर चालणे या वाटा कुणास ठाऊक
बुजता बुजत नाहीत जखमा, लक्तरे वाळत नाही
सरता सरत नाही काळोख, उगवती दिसत नाही
कुणाचा शाप जागतो आहे कुणास ठाऊक
प्रश्नांना उत्तरे सापडत नाहीत.

नाही असे नाही इथे कधी कधी बहर येतात
बहर येण्यापूर्वीच, इथे वृक्ष करपून जातात
इथे डाव मांडले जात नाहीत तोच उधळले जातात
पंख फुटत नाहीत तोच डंख मारले जातात
कुणी येतात अमृताचे बोल घेऊन
पावले फिरत नाही तोच हात बांधले जातात.

नांगरलेल्या भुईत कुणी बीजे पेरून जातात
कुणाच्या जहरी नजरा, ओले बहर जळून जातात

तळहातावर जीव घेऊन कुणी येत भरवसे देत
बोल फुटत नाही तोच अक्षरे मिटून जातात.

कुठवर लावाव्यात बागा-कुठवर बहर जोपासावे
जीव लावून उभवलेले उध्वस्त होत जात
दिशा देऊन जातात कुणी वाटा दाखवीत येत
कितीतरी आले गेले अजून उध्वस्त मानव जात.

अस्पष्ट होत जात अक्षरांचे अक्षरत्व
नष्ट होत जात स्थायीभाव, नष्ट होत जात सत्व.

□

## फिरत आहेत

फिरत आहेत
इतिहासाच्या दालनादालनातून
अहंमन्य नजरा वेध घेत
विध्वंसक वाघनखे बाळगून

प्रत्येक युग
एक नवा पेहराव
प्रत्येक देश
बदलता वेष
प्रत्येक दीप
उजेडाचे सोंग
अंधार मार्गी
एक दिशाभूल
तीच दारे
तेच तोरण
प्रत्येक नव्या गुढीला नवे वस्त्र
सिद्धांताचे
प्रत्येक वाट प्रकाशातून अंधाराकडे
प्रत्येक अहंमन्य हात
रणांगण पेटवीत
घडवीत रक्तरंजित इतिहास
रक्ताच्या महापुरातून रथ ओढणारे विजेते
लढवले जात कोट्यावधी
कोसळत्या कड्याखाली उध्वस्त.

□

## अजून विद्यमान

एका विद्ध पक्ष्याच्या पंखविहीन व्यथेतून
जन्म पावलेले आर्तस्वर
घुमत सर्वदूर
अजून सरले नाही
विकलांग वैषम्य
अजून पोहचली नाहीत पावले
स्वाधीनतेच्या पारावर
संपन्नतेचा केवळ भास
चंदेरी बदलते वेष
अजून कायम तेच रस्ते अद्यावत्
गोठवलेली क्षितिजे
रात्रीचे जहर पिऊन ताठरलेले डोळे
निशब्द कारुण्य-व्यथा सांगत
युगे-युगे.

अजून स्थिरावली नाहीत उद्दाम पावले
विझले नाहीत निखारे
अजून वस्त्रहीन सौजन्य
फरफटत रस्त्यावरून
अजून विद्यमान
काळाच्या काळजावर
वज्रभेदी व्रण.

□

## प्रत्येकाचे मनोगत, प्रत्येकाला कळू द्या

प्रत्येक मैलावर बदलणारे
निखळून पडलेले शब्द
शब्दकोशाच्या प्रत्येक पानात
शोभायमान
प्रत्येक शब्द प्रत्येकाचा
शब्दांचे नाते
भावुक पुष्पपरागाचे
निगडित सलोख्याचे
प्रत्येक शब्द भावपूर्ण
प्रत्येक स्नायूत चैतन्य
उजळ अंग प्रत्यंग
प्रत्येक शब्द बोलणारा
काहीतरी सांगणारा
त्यांना मोकळे फिरू द्या
त्यांचे मनोगत उकलू द्या
प्रत्येक शब्द चालू लागेल
असंख्य गर्दीतून
सातत्याचे वाण वाहीत
काहीच अबोध राहणार नाही
प्रत्येक जीव अर्थपूर्ण होईल
शब्दांना मोकळे फिरू द्या
प्रत्येकाचे मनोगत प्रत्येकाला कळू द्या.

## कुणाच्या–

कुणाच्या रुधिराचे समुद्र हेलावतात कुणाची गल्बते;
कुणाचे हे शुभ्रतर आयुष्य शीड होऊन फडफडते,
कुणी रोखले परचक्र, सोसलेत घाव सीमेवर
कुणाची उद्दाम पावले चालतात रक्ताळलेल्या गालिच्यावर !

शतकानुशतकांची राख अंगावर–धगधगते पेटते निखार
कुणी बांधलेत मांडव कुणाचे सुगम संसार
कुणाचे कारुण्य सांडते शिवारावर अंधारवाड्यात
कुणाचे घडवले जाते अलंकार, कुणाच्या घट्ट रक्तावर

कुणाचे विद्ध अंतस्थ, कुणाचे लयबद्ध सूर
त्यांच्या विलापिकेला, कुणाचेच लाभले नाहीत सूर.

□

# आरंभ स्वप्ने

खंदकावर अधिष्ठित पुरातन दुर्ग दोलायमान
त्यांच्या मर्मभेदी हाकांना मिळत नाहीत हुंकार, एक खंत
पायातल्या पुरातन दगडाचे अंतर्भेदी आर्तस्वर
हाती राख घेऊन परतणाऱ्या सूर्याला मागतात अंत.

कुठवर जोपासतील जीर्णत्व, सतत बघत वाट
कुणी येईल बांधून जाईल नवी वास्तु, निरपेक्ष हात
कालान्तराने बदलते प्रवाह, वाटाही वळण घेत
प्रत्येक इसवीसनाच्या तळहातावर नवा क्रूस जन्म घेत.

जेव्हा सूर्य बंदिस्त प्रकाशाचे प्रकाशत्व नष्ट होत जात
वादळे वर्दी देत विनाशाची, आकाश भरून येत
सैल होत निर्बंध, अमृतमेघ मुक्त होत
नव्या पर्वाची आरंभस्वप्ने, तेव्हा साकार होत.

□

## कुठवर झुलवशील–

कुठवर झुलवशील
प्रकाशानेही तोंड झाकावे एवढा गडद अंधार
काजव्यांचे दिवे लावून कुठवर उजळशील
कुठवर जगवशील, ही रक्तबंबाळ वसाहत.
तेच हात
अद्यावत रिते
मृत्यूला गौरवीत शेज बांधणारे
आकाशभेदी कल्लोळ सारीत
विजेत्यांच्या महोत्सवात पताका होऊन
नौबती झडवीत
झांजा वाजवीत–कुण्या संताच्या यात्रेत
कुण्या जत्रेत कुणाचे दैवत जागवीत
साक्षात्काराच्या भूतकथा सांगून
कुठवर जगवशील
भविष्यातल्या बिस्मयकथा सांगून
कुठवर झुलवशील
गतीचे पाय कापल्या गेलेले वास्तव्य
कुठवर चालेल ही रहदारी
भूत–भविष्याला जोडणाऱ्या पुलावरून
वास्तवाच्या काळ्या डोहावर
कुठवर झुलवशील .... .... .... ?

□

## समृद्धीचे शिल्पकार

कुणी बांधल्या नाहीत विहिरी त्यांच्यासाठी
सारा जन्म भिक्षांदेही.
रिते हात पसरून
अरे ! ही त्यांची मही
त्यांना आसरा नाही
अरे ! त्यांच्या आल्यागेल्याची
इतिहासात नोंद नाही.

समृद्धीच्या सभामंडपात
आमचे तोरण
आमच्या पताका
आमचा सन्मान
समृद्धीचे शिल्पकार
फिरतात दारोदार
मोहर कुणाचे
कोण राखणदार
तुरे खोवून आम्ही
फिरतो दारोदार.

□

## जगू दे त्यांना निवांत

जगू दे त्यांना निवांत अज्ञात अंधारात
दाटीत गर्दीत खालानात
थकलेले देह विसावू देत
पिवळ्या प्रकाशाच्या मोडक्या झोपड्यात
विलीन होऊ दे, चिपळ्या मृदंगाच्या नाद ब्रह्मात.

अरे ! त्यांना सराव आहे
पेटत्या चितेवर हात शेकण्याचा
अरे ! त्यांची घरटी बांधायला
आपल्या आवारात झाडे नाहीत.

जोवर तुझ्या माझ्यातले देव
झोपले आहेत तोवर,
पाडू नकोस
ही मंदिरे, त्यांचाच त्यांना आसरा आहे
अजून तुझी ओंजळ रिती आहे.

□

# जागरूक अस, माघारा बघू नकोस

जागरूक अस
माघारा बघू नकोस
युगे युगे जगताहेत
कित्येक काटेरी कुंपणावर
वाळवीत लक्तरे
दोन ध्रुवाच्या दोरीवर
लटकतं अस्तित्व
पाण्याविणा तडफडणारे
कोट्यावधी मासे तप्त वाळूवर.

जागरूक अस
माघारा बघू नकोस
तुझ्या दारावर धडकणारा भेसूर कल्लोळ
दुर्दैव दारुणतेच्या गर्तेत उभेत
युगे युगे चिखलात रुतलेली असंख्य चाके
धुव्वाधार पावसात
काळोख वितळण्याची वाट बघत.

मार्गस्थ हो
थांबू नकोस
उगाचच इतिहासजमा दुष्टाव्याचा मागोसा घेत
उगाचच गतकालीन संदर्भ शोध
थांबव तुझा बोगद्यातील वांझ प्रवास
ऐकून घे चिघळत्या जखमाचे चित्कार

भागणार नाही केवळ मशाली पेटवून
क्षणभर उजळून निघतील वाटा
पुन्हा जागा होईल काळोख
गवसणार नाहीत नवीन क्षितिजे.

झुंज द्यावी लागेल, झिजवावा लागेल देह
जखमावर मलम होऊन जगावे लागेल
स्वतः जखम होऊन.

समोर बघ
माघारा बघू नकोस
अरे ! तुझ्या बाहूत
प्रक्षुब्ध वादळालाही धडक देण्याचे सामर्थ्य
अंगांगातून उसळणारा तप्त लाव्हा
डोळ्यात तळपणारी विजेगत अस्मिता
अणकुचीदार, कट्यारीच्या पात्यासारखी
समोर बघ
माघारा बघू नकोस.

तुझ्या डोळ्यांत
उद्यात साकारलेल्या वाटा
भविष्यातील यंत्रणेच्या सजीव रेखा
तुझ्यात घुमतो आहे
सर्वदूर पसरलेला विद्ध कल्लोळ
क्रान्तीच्या गगनभेदी उत्तुंग ज्वाला
समोर बघ.......

जाण असू दे .......
तुझ्या दैदिप्यमान अस्तित्वाची
झरू दे तुझ्या वाणीतले स्वर
प्रकाशाचे गीत
उदयमान होऊ दे तुझ्यातला प्रकाश
मंदाग्नीला चेतवणारा.

समोर बघ
माघारा बघू नकोस.

□

## उगाचच गाऊ नकोस

सांगू नकोस
बर्फाळलेल्या प्रदेशातल्या वादळकथा–
जथे प्रकाशाचे तुडुंबलेले समुद्र चौका चौकात.
लखलखत्या दिव्यांचे नखरेल नृत्य
रस्त्यावर अंथरलेले बिलोरी आरसे
जेथे उसळते तारुण्य भरभरून शिगोशीग
फेसाळलेल्या तांबड्या पेल्यांचे सुखाधीन वैफल्य
छद्मी वाद्यवृंदात मिसळलेले

गाऊ नकोस उगाचच
सांगू नकोस, साखरझोपेत पाहिलेली भयाण स्वप्ने
तृप्त पोशाखी माणसांची तरंगती दुःखे
तडा गेलेल्या सुखात्मक वक्ररेषा
मला दाखवू नकोस...

मी पाहिले आहे
निर्धनांचे जन्मस्थ दुःख
भेगाळलेल्या जमिनीवर उमटलेले खोल व्रण
जेथे जखमा झाकायला मिळत नाहीत हात
अरे ! त्यांच्या हातात वळवळते सर्प
ढासळणाऱ्या मातीवर अल्पायुशी घरे
जांभुळलेले विटके देह राखडी अस्तित्व

सांगू नकोस त्या कथा
अशांतीची पेटती राने समरभूमीवर
चिलखती घालून उभेत ब्लू प्रिंट्स हातात घेऊन
अमानुष खेळ खेळणारे

जेथे दिसत नाहीत हात माणूस जोपासणारे
सांगू नकोस वाळवंटातल्या खजुराचे मनोगत
तृषार्त उंटाच्या दीर्घ कथा
बर्फ नगरीतल्या निष्पर्ण झाडांचे स्पंदन

मी पाहिलेत इथे
भर्धाव बरसत्या भाल्यांच्या शर्यती
बधीर झालेले अगणित देह
जेथे जुळता जुळत नाहीत
दूरावलेली आतडी
रक्तहीन स्नायू भिजता भिजत नाहीत
मला सांगू नकोस, शीतकटिबंधातल्या
उष्णकथा.
आणि उगाचच गाऊ नकोस—

□

## इथे सारे काही वेगळेच

इथली भाषा,
भाषा नव्हे
बोलते काही
सांगत मात्र काही नाही

क्वचितूच भेट
मनाच्या मालकाची
पडवीवर हुजरे शब्द
घेत समाचार
आचार विचार
मेळ जुळवित

इथे जिव्हाळा
फेसाळलेला
इथले पाणी–थिजलेले
बर्फ वितळतो
तहान जात नाही
मनाच्या 'फ्रीज' मध्ये
शिळे शब्द ताजे होऊन
बाहेर येत.

इथे माणूस–एक अभ्र
कोरडे आभाळ
इथे प्रेम
एक अवतरण चिन्ह
डाइनिंग हॉलमधल्या
पॉश फर्निचरसारखा
इथला माणूस.... .

इथे नजरा
बुबुळांची हालचाल
अकाली खोटे अंधत्व
काळ्या काचात झाकलेले
इथे मंत्र, एक अविश्वास
यंत्र... दैवत
इथे शब्द, शुद्धलेखन
ठाऊक नाही
जगण्याचे व्याकरण

इथे माणूस
एक रसायन
बाटलीत भरलेले
टीचभर पाण्यावर
जगणारे क्रोटन्स.

□

# मी फिरेन

मी फिरेन प्रत्येक दारावर थाप देत
निघून जाईन ....................
प्रत्येकात एक सूक्ष्म
पाकळ्यात पराग
प्रत्येक स्वर एक धून
प्रत्येक वृक्ष अंतस्थ गाभा
एक मृदुलत्व
प्रत्येक दारात एक वृंदावन
मी टिपून घेईन सारे
स्वरांच्या जल्लोषात
सप्तरंगी भाव गुंफित निघून जाईन
प्रत्येक दारावर देत थाप.

आंगणात दुडदुडणारी निरागस पावले
उमलत्या ओठातून टपटपणारे बोबडे बोल.
वृक्षांची सुरम्य आरास रामप्रहाराची
मोगरीचा मत्त सुवास
स्मृतींना चाळवणारा स्पर्शगंध
तुझ्या दारावर बोगनवेल
मी क्षणभर थांबून जाईन
प्रत्येक दारावर थाप देत निघून जाईन.

कित्येक फुले माळावर निर्माल्य होत
एकटेच जगतात रिठावर
रसिकांची वाट बघत
मी अलगद् खुडून घेईन
कुण्या फूलपात्रात ठेवून जाईन
प्रत्येक दारावर थाप देत निघून जाईन.

मी जगेन प्रत्येकाला नजर देत
प्रकाश देत
मालिन्याला उजाळा देत
टिपीत संवेदन भाऊक भाव
मी त्यांचे गीत होऊन निघून जाईन
प्रत्येक दारावर थाप देत.

अशी कित्येक अक्षरे
ज्यात पोथ्यांचे मांगल्य
मंदिराच्या पायथ्याशी
बसलेत झांजा वाजवीत
मी टिपून घेईन त्यांचे भाव
माझ्या अक्षरांना अक्षरत्व देत
प्रत्येक दारावर थाप देत निघून जाईन.

□

## म्हातारे मन

तेव्हा कुणीच नसते सोबत
जेव्हा सावल्या पांगतात
अंधाराच्या स्वाधीन होत
म्हातारे मन घालीत येरझारा
पडक्या वाड्याच्या पडवीत
वाकला देह सांभाळीत.

आपलेच प्रश्न प्रश्नचिन्हे होऊन बसतात
बाकुल्या दाखवीत
उत्तरे जवळ असूनही सापडत नसतात
गोंधळ वाढत जात उत्तरोत्तर
सर्वस्वी पराधीन हे मन

दूरवर पसरलेले दिवे लुकलुकत
आपल्याच नादात
कुजबुजत आपसात
सारे दुरावलेले असतात.
धाडस होत नाही
आपले म्हणून सांगायला.
तेव्हा एकटी दिवलान जळत
पिंपळाला सोबत देत
गावाबाहेर
बांधावर
अश्रू ढाळीत
दिवस उगवण्याची वाट बघत.

□

## इथे थांबू नकोस, निघून जाशील

इथे थांबू नकोस निघून जाशील
कुण्या घनदाट अरण्यात
भयाण काळोखावर कोरलेल्या सळईदार रेषा
वाट दाखवीत तुझ्या पुढ्यात येतील.

गुहेतील श्वापदेही माघारतील तुला पाहून
वाट देतील
जन्मताच विषकुंभ घेऊन आलेले सर्पराज
तेही माघार घेतील, तुला वाट देत
अभिवादन देत निघून जातील.
दंश करणार नाहीत, कुणी झेपावणार नाही
छद्मी कोल्हेही कुण्या झुडपात लपून बसतील
तुझा मार्ग सुकर होईल.

बलदंड हत्तीचे कळप
कुण्या सरोवराच्या आरसेमहालात
विहारमग्न असतील
कुणीच तुझ्या वाटा रोखणार नाही
सहज निघून जाशील.

इथे मात्र थांबू नकोस
इथे वळणा वळणावर, तीरंदाज डोळ्यांची उघडझाप
तुला गवसणार नाहीत इथल्या वाटा
थांबू नकोस, या चकव्यांच्या वसाहतीत
तुला भोवळ येईल
इथे थांबू नकोस
निघून जाशील.

□

# चित्रलिपीतले चित्रकार...

आकाशाशी प्रीत जुळवणाऱ्या देवदारांचे सुसंवाद
ऐकलेच नाहीत
दिवसभर कल्लोळात पेटून निघालेला सूर्य
बघितलाच नाही.
वितळत्या बर्फखंडात रुतलेली उदास पर्णहीन झाडे
दिसलीच नाहीत
आजन्म गतीची पावले मोजीत
आकाश गर्भ वर्तुळांचा शोध घेत
उगाचच निर्जीव वनात फिरत राहिलो
संगरात हरवलेल्या पगड्यांचे शोध घेत
फुटलेल्या बांगड्यांचे हिशेब जुळवीत
बखरीतल्या जीर्ण पुरातन वाड्यातून फिरत राहिलो
आम्ही चित्रलिपीतले चित्रकार.

बासरीवर स्वर झेलीत, बेधुंद स्वरांची मैफल
गुराखी पाहिलेच नाही...
गीत ऐकलेच नाही....

□

## दर्शनी सौंदर्य म्हणून

बिलोरी आरशागत झगमगते आयुष्य
ड्रॉईंगरूममध्ये पहुडलेल्या आरामशीर खुर्चीमारखे
सुखाधीन
कपाटात नीटशी लावून ठेवलेली पुस्तके
शेल्फमध्ये जरतारी आवरणात
बंदिस्त महान आत्मे
एक दर्शनी सौंदर्य म्हणून .........

रेशमाहून मऊ निमुळत्या बोटातून
झरणारी मुलायम लोकर
भविष्य गुंफित
बाजूस खिळे ठोकलेला ख्रिस्त पिवळ्या भिंतीवर
एक दर्शनी सौंदर्य म्हणून ...

व्हरांड्यात काटेदार हिरवे गडद क्रोटन्स
उभट कविलवाण्या अनामिकांच्या तसबिरी
फुलदाणीत कुण्या रानटी झाडांची रससंगती
एक दर्शनी सौंदर्य म्हणून .. ...

□

## हा बहर माझा नाही

मांडव झाकून विसावलेला
गुच्छेदार शुभ्रवेल
सांगत आहे
हा बहर माझा नाही
ही फुले माझी नाहीत

कुणी नकळत बोलून गेला असेल
दोन ओले शब्द
क्षणाचीच सोबत
क्षुब्ध झाली असेल
मनातील वावटळ
संचारले असेल अंगात बळ
आणि नकळत चालून आलो इथवर

नकळत लागले असतील थोरामोठ्यांचे हात
ही वास्तु उभारायला
कुणाच्या सद्‌भावना आल्या असतील सोबत
सावल्या होऊन

आणि अलगद उकलले गेले असतील
गळ्याभोवती आवळलेले घट्ट फास
धुक्यांत गुंडाळलेल्या वाटा
धुतल्या गेल्या असतील;

एकट्याने उभवला गेला नाही हा मांडव
हा बहर माझा नाही
हा उभार उचलायला कित्येक हात
गुंतले असतील, पत्करून वांझ जीवन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४४८
न. क्र. 23408
काव्य 23/7/52
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

गुच्छेदार शुभ्रवेल सांगत आहे
हे वैभव माझे नाही
हा बहर माझा नाही
ही फुले माझी नाही.

□

## झुळुक

अशी एखादी झुळुक येते
कित्येक दिवसांचे जागरण निवून जात
मन पालवून जात प्रसन्नतेच्या गारव्यात
अन् ! पुन्हा चालू लागत थकलेली पावले.

वाट चालून चालून थकून गेलेला जीव
एकटाच विषण्णतेचे ओझे घेऊन
कसेबसे पावले टाकीत
तेव्हढ्यात बाजूचा कुणी वृक्ष
फांद्या हालवीत मला बोलावीत
अन् ! पुन्हा माझे थांबलेले पाय चालू लागत.

गर्दीतल्या गल्बल्यात कांगावलेला जीव
एकटाच बाजूस उभा असतो
तेव्हा कुणी अनोळखी जीव
जीवास जीव लावून जात
आणि पुन्हा माझे थकलेले पाय चालू लागत.

□

## अजिंठ्याच्या परिसरात

युगे लोटली तरी सुरक्षित
धरतीच्या कुशीत
सुवासिनीच्या पैठणीत जपून ठेवलेला ऐवज
मानवाने मानवाला दिलेले मानधन
सौंदर्याच्या वेष्टनात झाकून ठेवलेले
अबाधित सत्य....
साफल्याचे दीर्घ सूत्र

अजून आकलन झाले नाही
मानवाला मानवी सत्य
कलावंतांनी कोरलेले हृद्‌गत
कल्पनांच्या परिसरात
फिरतो आहे मानव अजून
संशोधकाच्या दृष्टीला गवसले नाही अजून
उगाच शोधित आहे अवशेष
कालक्रमणाच्या साखळ्या जोडीत
दिसत नाही अजून
दगडात कोरलेला बुद्ध
जागा होऊन बोलणारा सद्भाव

० ० ०

कलावंताचे स्वप्न अजून फिरते आहे
अधान्तरी आसपास
आसमंतात
अजिंठ्याच्या परिसरात.

□

## जन्मलास तेव्हा

जन्मलास तेव्हा
तुझ्या सोबत बायबल होते
तुला अवगत होते
ज्ञान अज्ञान
सत्य असत्य
तत्त्व महान
तुझ्या आक्रोशात गीतेचे स्वर होते
तो तुझा जन्म नव्हता
अनेक सद्‌भावनांनी
घडलेली सान मूर्ति
कलावंताच्या नितळ बोटातून
उतरलेले
एक स्वप्नांकित सत्यशिल्प,
सारे तुला ज्ञात होते,
अवगत होते
सत्य असत्यामधले पारदर्शक अतर
सारे ज्ञात होते—ठाउक होते
वाढत्या दिसाच्या पेटत्या उन्हात
फेकून दिल्यात सद्‌भावना
सोबत आलेल्या
आणि मोकाट सोडलेत
कोंडलेली अमानुष श्वापदे
स्वैर घातकी....

तुला ज्ञात होते
—कुरतडून जाईल तुझे जीवन
तुला जाण होती
उभा आहे अंतरावर कानोसा घेत

इतके ठाउक असून खेळलास जुगार
सत्य—असत्याच्या दारी बांधून
जिंकून गेल्याच्या कैफांत
उधळलेस डाव
कोंडलेत संत
तुझ्याच कारागृहात
अमानुषतेने हलविलीस सूत्रे
जागा केलास राक्षस झोपलेला
अहंकार
तुझ्या जहागिरीवर रखवालदार
हद्दपार केलेस आप्तेष्टांना
तुला ज्ञात होते
दिक्कालाच्या पल्याडचे
अबाधित सत्य
जीवनाचा महान आशय

० ० ०

जन्मभर फाडलीत पाने
सोबत आणलेल्या पुस्तकाची
आज फिरतो आहे एकटाच
जगाच्या वावटळीत
केवळ पुस्तकाचे आवरण घेऊन.

□

## प्रश्नोत्तरे

इथे प्रत्येक माणूस एक प्रश्नचिन्ह
उगाचच करपून जातो जीव
प्रश्नोत्तराच्या वावटळीत
धुके पांघरून वाट शोधण्याचे वांझ यत्न
शंकाकुशंकांची गर्दी
उगीचच मनस्ताप
वाद । वितंडवाद । कांगावा
अनवाणी संशय
उगीचच नशा न करता–डोलणारे शब्द
प्रत्येक माणूस एक प्रश्नचिन्ह
अर्थ लावून लावून शब्द झिजून जातात
निस्तेज होत
प्रश्न झुरून झुरून वाळून जातात
कुमारी विधवेगत–
जावे वाटते इथून खूप दूर
जेथे प्रश्नातच उत्तरे सामावली असतात
प्रसंगच येत नाही प्रश्नोत्तरांचा
खूप दूर
क्षितिजाच्या कवेत
उंच पहाडीवर
जेथे आकाश दोन बोटावर
तरंगत असते
बालीश मनाशी खेळ खेळत
निकोप मन
आकार घेत.

□

## आज ना उद्या

अव्हेरू नकोस या शब्दांनाही मोल येईल
दुर्लक्षू नकोस हे वाळूचे पहाड
न जाणो, भूकंप होऊन गडप होतील
तेच पुन्हा समुद्र होऊन जन्मास येतील.

अव्हेरू नकोस, अवधान ठेव, बघून घेशील
आज ना उद्या, मौक्तिके बाहेर येतील
याही शब्दांना परिसाचे येईल मोल
उद्याच्या प्रत्येक पानावर स्मृती होऊन कोरल्या जातील.

□

# आठवेल सारे

मध्यान्ही तळपणाऱ्या सूर्याची आग पाखडीत
जगत होतास
दिवस परतल्यावर
काळोखाच्या आक्रमणाची
चाहूल देत । येईल सांज
तेव्हा आठवेल सारे
गत आयुष्याचा मागोवा घेत
धुरकटलेले आठव
तेव्हा कुणीच धजणार नाही जवळ यायला

० ० ०

आजवर जपून ठेवलेली कोरीव मूल्ये
जोपासलेली जिवापाड
हसतील तुला खदखदून
वाकुल्या दाखवीत
तेव्हा तुझ्याजवळ तपशीलवार यादी होती
लहान मोठ्यांची
प्रत्येकाच्या मोबदल्यातली हिशेबाची
आक्रसलेली भाषा
मनाच्या चामडी 'पर्स 'मधून
मोजकेच शब्द बाहेर येत
भेदक । उपरोधिक ।
केवळ शुद्ध

कित्येक डिवचले गेले असतील बेनाहक
अहंतेच्या जाळात पोळून निघालेले
कित्येक दुरावले असतील
विव्हळत असतील । खंजीर खुपसल्यागत

अजून बुजल्या नसतील जखमा
कित्येक पडले असतील उघड्यावर
मावळते अस्तित्व घेऊन
तुला वाटले असेल तेव्हा
जिंकून गेलास !

काळोखाच्या आक्रमणाची
चाहूल देत सांज येईल तेव्हा
जागी होईल सारी भुतावळ
धावतील तुझ्या अंगावर—किंचाळीत
लोहदंडात कोंडलेल्या श्वापदागत.

□

## आयुष्य असेच गेले

नृत्य सरल्यानंतरचे चंद्रहीन आकाश
आजवर बघत आलो
असेच आयुष्य निघून गेले, किनारे भेटलेच नाहीत
आयुष्य असेच भटकत्या अभ्रासारखे
कधीच भारावलो नाही, बरसत्या धारात
भिजलोच नाही

आजन्म किनाऱ्यावर लहरत्या लाटांचे सूर टिपीत
उसळत्या लाटांवर कधीच झेपावलो नाही
अकाली पावसाची सर क्वचितच आली असेल
आयुष्य असेच गेले, ओंजळ कधी भरलीच नाही.

□

# मी कुणी अज्ञात माळी

मत्त मोराचा पिसारा पैंजणे आम्हा कशाला
शीळ का वाऱ्यास द्यावी कंठ द्यावा कोकिळेला
निर्झरा का ताल द्यावा चाल सांगावी गजाला
विश्वव्यापी अस्मितेचे सूर आम्ही घोळतो
मी कुणी अज्ञात माळी, ही फुले जोपासतो.

दुमडलेले ओष्ठ जे, आम्ही ते उकलून जातो
मर्त्य शब्दांनाही आम्ही जाणिवेचे बोल देतो
त्या विझाल्या काडवाती, मी पुन्हा लावून घेतो
मानवानी मानवाला बोललेले सांगतो
मी कुणी अज्ञात माळी ही फुले जोपासतो.

□

## सामान्याची उगाच करुणा

सामान्याची उगाच करुणा
विश्वव्यथेचे वृथा पांघरुण
सामान्याचे विश्व वेगळे
निशाचराचे रोज जागरण.

तुझी नि माझी सोबत त्यांना
कधी न झाली कधी व्हायची
युगायुगांची सोबत त्यांना
अखंड जळत्या दारिद्र्याची.

सामान्याच्या दूर कितीतरी
असामान्यपण माझ्या स्वप्नी
धुरकटल्या शब्दांशी नाते
व्यर्थ निरक्षर माझी गाणी.

□

## मी : एक पात्री नाटक

मी : एक एकपात्री नाटक
सारे आयुष्य "ग्रीनरुम"मध्ये
रंग लावण्यात वेष बदलण्यात
रगरंगोटी करून
दिव्यांच्या झगझगाटात
कुणी धरलेल्या तालावर
हलत्या शरिराचा तोल सांभाळीत
सारे लक्ष पडद्याआड लपून बसलेल्या
'प्रॉम्टरने' ध्वनित केलेल्या शब्दावर

परंपरेने आलेल्या अनेक सद्भावना
केव्हाच फेकून दिल्यात
मनातले मन केव्हाच विकून टाकले
लटक्याच्या बाजारात

कित्येक नव्या निष्ठा जवळ आल्या
घेरून घेत–झंजावाती वेग घेऊन
झपाटला गेलो–बेभान झालो
त्याही झिडकारल्यात

जीवन एक "ब्लॉटिंग पेपर"
काहीच लिहले गेले नाही
तग धरत नाही कोणताही सालस शब्द
सारे आलेत–तसेच गेलेत.

□

## बघणे झाले नाही

किती तरी बघायचे होते–बघणे झाले नाही
पडदानशीन डोळे माझे–काहीच बघू शकले नाहीत.

जन्मताच घटिका मोजीत
पडलेले कित्यक निपचित
जगतात रोजचे जीवन
समजून स्वतःस शापीत
पाचोळ्यात जगले जीवन डोळे पाणावले नाहीत
पडदानशीन डोळे माझे–काहीच बघू शकले नाहीत.

घराच्या छप्परातून
आजवर बघितल्या तारा
मला बिलगून राहिला
माझ्याच बागेत हळुवार वारा
कुणाचे दुःख टिपून घ्यायला–वेळ झाला नाही
पडदानशीन डोळे माझे–काहीच बघू शकले नाहीत.

रात्र कुशीत घेऊन
उगवतीची वाट बघत आलो
दूर कधीच नव्हतो मी
मी माझा होऊन राहिलो
माझेच मला पुरून उरले–वेळ झाला नाही
पडदानशीन डोळे माझे–काहीच बघू शकले नाहीत.

आम्ही सराईत सफाईदार
बेगडी जीवन जगणारे
पेपरांतील बारीक मजकूर
ठळक संदेशे वाचणारे
उसळले नाही रक्त–बाहू स्फुरले नाही
पडदानशीन डोळे माझे–काहीच बघू शकले नाहीत.

सारे आयुष्य काढले
स्वतःचीच दृष्ट काढण्यात
पाहिले मी कित्येक आघात
रस्त्यावरचे ! डोळ्या देखत
मीच मला जोपासले–कुणाचाच झालो नाही
पडदानशीन डोळे माझे–काहीच बघू शकले नाहीत.

वाराधुंदीत हरवलेली
कित्येक घरे पाहिली मी
कित्येक उध्वस्थ अजाण
ह्या डोळा पाहिले मी
चहाच्या कपाबाहेरची–वाफ कधीच जाणवली नाही
कितीतरी बघायचे होते–बघणे झालेच नाही.

☐

## त्यांना हवे असतात

त्यांना हवे असतात हात सत्य साकारणारे
करावे लागते प्रेम प्रत्येक दगडावर
जोपासावे लागतात
करावी लागते प्रीत लोहदंडाशी
हलते बुरुज सावरावे लागतात
स्नेहांकित कराव्या लागतात वाती
तेव्हाच दीप उजळतात
त्यांना हवे असतात शब्द अंतर्गृहे उजळणारे
सत्य साकारणारे—

खंदकाशी प्रीत जुळवावी लागते
तेव्हा झरे पाझरतात
तेव्हा उध्वस्त रानेही धुवून निघतात
बहरुन येत आसमंत जीर्ण झाडेही फुलारतात
त्यांना हवे असतात बाहू, सरकले सांधे जुळवणारे
सत्य साकारणारे—

त्याना नको असतात पंख आकाश धुंडाळणारे
नको असतात स्वप्निल भास, भविष्य सांगणारे
नको असतात केवळ शब्द–उगाचच पेटणारे
त्यांना हवे असतात हात, सांप्रत उजळणारे
सत्य साकारणारे—

□

## बोधी वृक्ष

गाथांचे गणित, सत्याचे शोध जन्मभर
सत्य आलेच नाही हाती
किनाऱ्यावर भ्रमंती माडांच्या सोबत
शिंपा आल्याच नाही हाती.

आजन्म चाललो, कुठे थांबलोच नाही
कित्येक घाट निघून गेलेत, विसावलोच नाही.
जन्मभर संदर्भ शोध, मूळाक्षरे शोधीत
बखरीतले सत्य हातात आलेच नाही.

आयुष्य असेच गेले ओंजळ भरलीच नाही
उगाचच शोध निष्फळ, बोधीवृक्ष दिसलाच नाही—

□

## त्यांचे जग

कोण मापील त्यांची उंची
तेथे हात लागत नसतात
भावुकतेच्या ओलीतावर
त्यांच्या बागा फुलत असतात.

भावनेची वाताहात
भावनाच जाणू शकतात
वाद वादंगाच्या दूर
निर्भय जीवन जगत असतात.

बुद्धीजीवी आपण सारे
तुझे माझे राठ हात
घरट्यामधले बोबडे बोल
फक्त तेच जाणू शकतात.

परागाहून मृदुल मन
लौकिकाच्या खूप दूर
विजा पडोत कुठेही
भरून येतो त्यांचा ऊर.

□

## आनंद

दुतर्फा गर्द झाडीत
पावलागावलावर सांडलेले दहिवर
पिऊन घेशील-

भिजली असतील राने
उगवतीच्या प्रत्येक किरणात
अंतस्थ सामावलेली ऊब
पांघरून घेशील-

भारावून निघालेले आसमंत
वार्धक्य आले तरी झाकून घेत स्वतःस
पानाफुलात लतावेलींच्या गारव्यात
निरामय आनंद लुटून घेशील-

प्रत्येक वाट वळणदार
पाऊल स्पर्श-गंधवात
पावलापावलावर सांडलेली मेहेंदी
लावून घेशील-

प्रत्येक अनुत झाकले सौंदर्य
स्वर्णमयी पोत-लुटून घेशील-

□

## कोरडवाहू जमीन इथली

कोरडवाहू जमीन इथली
कधी उगवते नाही उगवत
अकाल येथे । मेघ भटकते
असे कधीतरी येऊन जात.

व्यर्थ दशेची कशास चिंता
उगा कोळसे कशा उगाळित
ज्या प्रश्नांना नाही उत्तरे
अशी प्रमेये कशास मांडत.

प्रकाश भयभित सदा बावरा
मलीन झावळ झावळ बघणे
इथे सावल्या प्रकाश गर्भित
केवळ असणे अथवा नसणे.

अचेतनाला सचेतनाचा
स्पर्श । जळावे ओले इंधन
स्नायुमधले रक्त गोठले
म्हणूनी जागे कातर स्पंदन.

□

## ह्या पेला भरुनी घ्यावा

पेटत्या चितेच्या ज्वाला
त्या पल्याडच्या खाईत
अस्पष्ट कुणाच्या हाका
अपुल्यासी बोलावीत.

मी कसला येथे जगलो
जगण्याचे धाडस केले
पदरातील ओटी सरली
हे पदर अता भिजलेले.

पुसुनी घे अश्रू डोळा
आपुले न काही येथे
मी उगाच म्हटले होते
वास्तवात काही नव्हते.

घे जगून जीवन ऐसे
जन्माची भ्रान्त फिटावी
ना पुनश्च येणे येथे
जगण्याची आंस सरावी.

हे जीवन जगता जगता
जगण्याचा सोस उरावा
या इथुनी जाता जाता
हा पेला भरुनी घ्यावा.

□

## उगाच

हे बहर कधीचे सुकले
वाराही फिरकत नाही
कुठवरती जगणे आता
जगण्याची केवळ ग्वाही.

निष्प्रेम फुलांची शेज
पुष्पातिल सरले प्राण
लावाव्या कुठवर ज्योती
ओवाळुन पंचप्राण.

या विषण्ण ओसाडीत
स्नेहाचा कुठवर सोस
स्मृति आज दिवंगत साऱ्या
घर माझे पडले ओस.

बाजार कधीचा सरला
गणगोत निघोनी गेले
व्रण माझ्या अंगावरचे
मी उगाच शोधत बसले.

□

## पार तू बदलून गेला

काय मी मागू कुणाला
या इथे सारे भिकारी
भक्ष्य मी शोधू कुठे
या इथे सारे शिकारी.

ते पुढे गेले निघोनी
ना कुणी माझ्या सवे
वाट हिरमुसली बिचारी
चालते माझ्यासवे.

स्वप्न होते सोबतीला
आजवरती । संपले
मी किती बोलू स्वत:शी
शब्दही कंटाळले.

आजचे जे ना उद्याचे
चेहऱ्यावर चेहरे
जे बदलते रंग त्यांचे
ते बदलते मोहरे.

चेहरा माझाही आता
तो तसा ना राहिला
आरसा सांगून गेला
पार तू बदलून गेला.

□

## ते होते तोवर त्यांचे

हे दीप विझल्यावरती
धगधगती अंतर्ज्योती
विझल्यावर जळत्या ज्वाला
धगधगते अजुनी धरती.

ही सरणे सरल्यावरती
हे स्मशान जागे होत
स्मृति दिवंगताच्या विझल्या
राखेतून स्फुंदत येत.

ते होते तोवर त्याचे
गाईले कुणी ना गीत
अस्तंगत झाल्यावरती
बरसात फुलाची होत.

□

## शोधतो मी

शोधतो मी आसवे
या निळ्या डोहात आता
हरवलेले शोधतो मी
भास जो आभास आता.

भंगल्या माझ्या स्मृतीचे
शोधतो अवशेष आता
जी फुले मी माळलेली
शोधतो निर्माल्य आता.

पापण्यांनी झाकलेले
शोधतो मी अश्रू आता
जे ढगांनी झाकलेले
शोधतो आकाश आता.

झोपल्या संवेदनांचे
स्वप्न आता शोधतो
पेटते अंतस्थ माझे
मी निखारे शोधतो.

मज नको आकाश जे
चांदण्यांनी झाकलेले
मज नको सर मौक्तिकांचे
शोधतो मी शिंपले.

□

# जन्म माझा मी जळावे

मागणे माझे न काही
जन्म माझा मी जळावे
भडकत्या ज्वालान्तरी
रूप माझे मी बघावे.

दीप जे मंदावलेले
मी तयांना स्नेह द्यावा
भंगली वाद्ये जयांची
बासरीला सूर द्यावा.

बावरा काळोख प्यावा
जन्म माझा मी जळावे
चालता जोडीत जावे
आजवरचे हे दुरावे.

काजळी काढून डोळा
मी प्रभा द्यावी तयांना
चालताना हात द्यावा
ना कुणी येथे जयांना.

जन्म माझा मी जळावे
हासताना मी जगावे
जन्म हा संपून जावा
हास्य मी पेरीत जावे.

☐

## भूक एकच राहिली—

संपले केव्हाच माझे
गीत माझे राहिले ना
भावनाची राख झाली
मीच माझा राहिलो ना.

गीत नोहे हे उसासे
अंतरीची आग–लाही
अंध हे डोळे धुराने
पेटला चौफेर वन्ही.

ही नव्हे माझी व्यथा
विश्वव्यापी दुःखितांची
हे उसासे अंतरीचे
ही व्यथा माझ्या मनाची.

ना फुटे पान्हा अता
शब्द वैरी जाहले
कां बरे। त्यांनी वदावे
कंठ माझे दाटले.

दुःख या डोळा दिसावे
ओढ एकच राहिली
पापण्या माझ्या भिजाव्या
भूक एकच राहिली.

□

## असे क्वचित्‌च भेटतात-

असे क्वचित्‌च भेटतात
आठव ठेवून निघून जातात
बाकी सारे असेच मिस्किल
छद्मी हास्य देऊन जातात.

असे क्वचित्‌च भेटतात
अंतरंग उजळून जातात
बाकी सारे असेच
अंतर्मने सोलून जातात.

असे क्वचित्‌च भेटतात
भिजली काया भिजले भाव
बाकी सारे असेच
त्यांना नसते नाव गाव.

असे क्वचित्‌च भेटतात
काही तरी देऊन जातात
बाकी सारे असेच
असले नसले घेऊन जातात.

असे क्वचित्‌च भेटतात
रिती ओंजळ भरून जातात
बाकी सारे फुले खुडुन
काटे इथे ठेवून जातात.

□

## देव मागे राहिले

गंध ज्यांच्या मृत्तिकेला
पावले, ज्यांची फुले
चालली दिंडी पुढे
देव मागे राहिले.

संग ना निःसंग जे
एकट्याने चालले
कल्पवृक्षांचे मळे
होऊनिया जे राहिले.

जे कधी कोमजले ना
ना कधी जे भ्रष्टले
झुंबरे होऊन जे
आकाश ज्यांनी झाकले.

ते कुठे गेलेत वेडे
वेड ज्यांनी लाविले
अस्थी ज्यांच्या दर्शनी
बाजार आम्ही मांडले.

हिंडती घेऊन दिंड्या
देव ज्यांचे लोपले
शोधती अपुली खुशाली
देव मागे राहिले.

□

## गीत वाऱ्याने टिपावे

अस्मिता ठेवून जागी
मार्ग माझा चाललो
दूरच्या थडग्यावरी
निर्माल्य होउन राहिलो.

सत्य मी नाकारले ना
मी रिठावर जागलो
घेऊनी हातात चिंध्या
मार्ग माझा चाललो.

मैफली किती रंगल्या
रागदारी गायिली
भैरवी माझीच मी
एकट्याने ऐकली.

अंत मी माझा बघावा
गीत माझे संपलेले
मृत्यूच्या डोळ्यात अश्रु
मी बघावे दाटलेले.

दूर मी गेल्यावरी
गीत वाऱ्याने टिपावे
सूर माझ्या अंतरीचे
आसमंती विर्घळावे.

□

REFBK-0023508
REFBK-0023508
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४४८
२३५०८
काव्य २३।७।८८
(स्थळ प्रत)